पणजी : गुरुवार,
दि. ४ डिसेंबर २०१४ गोमंतक

# तिलारी समस्यांवरील शोधनिबंधाची विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

**दोडामार्ग, दि. ३ (प्रतिनिधी)**

मुंबई विद्यापीठाची जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा नुकतीच देवगड येथील स. ह. केळकर महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नवनिर्माण शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रशांत गवस याने तिलारी पुनर्वसन ग्रस्तांसमोरील समस्या या विषयावर संशोधन प्रकल्प सादर केला. या प्रकल्पाची उत्कृष्ट संशोधन प्रकल्पासाठी विद्यापीठाने निवड करून त्याचा गौरव करण्यात आला. आता हा संशोधन प्रकल्प पनवेल येथे होणाऱ्या विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी पात्र ठरविण्यात आला आहे. त्याबद्दल प्रशांतचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तिलारी प्रकल्पाचा सर्वांगीण अभ्यास करतानाच या प्रकल्पात बाधित झालेल्या पुनर्वसनग्रस्तांची सध्या काय स्थिती आहे. त्यांच्यासमोर कोणत्या समस्या आहेत, त्या सोडविण्यासाठी कोणती उपाययोजना केली पाहिजे यावर सदर संशोधन प्रकल्पाद्वारे प्रकाश टाकण्यात आला आहे. एका ज्वलंत सामाजिक समस्येवर संशोधन केल्याबद्दल आविष्कार स्पर्धेच्या तज्ज्ञांनी समाधान व्यक्त करून विद्यापीठस्तरीय स्पर्धेसाठी या प्रकल्पाची एकमुखाने निवड केली. प्रा. डॉ. एस. यु. दरेकर यांनी प्रशांत गवस यास बहुमोल मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष श्रीपाद हळबे, संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेट्ये, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील व सर्व प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी यांनी प्रशांत गवस यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.